
दै. प्रजावाणी दि. ३१/०१/२५

# बनावट नंबर प्लेट वापरुन ट्रक चालविणाऱ्या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)** - बनावट नंबर प्लेट वापरुन ट्रक चालविणाऱ्या चालकाविरुध्द नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून ट्रक चालक फरार आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी बनावट नंबर वापरुन फसवणूक करणाऱ्या वाहनांची माहिती काढून कारवाई करण्याचे आदेश पोलीस स्टेशनच्या प्रभारी अधिकाऱ्यांना दिले होते. ट्रकची चोरी करुन त्याची तोडफोड करुन भंगारमध्ये विक्री करणाऱ्या आरोपींचा शोध नांदेड ग्रामीण पोलिसांनी सुरु केला होता. जुना कौठा भागातील गुरुद्वारासमोर एक ट्रक संशयास्पद



उभा असल्याची माहिती नांदेड ग्रामीण पोलिसांना मिळाली. पोलीस निरिक्षक ओमकांत चिंचोलकर, फौजदार ज्ञानेश्वर मठवाड व पोलीस कर्मचारी यांनी रविवारी दुपारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी उभा असलेल्या ट्रक क्र. (एमएच २७-बी.एक्स. ८४८८) हा ताब्यात घेवून या ट्रकचा चेसीस क्र. एमटी-५४१०२१ एचआयव्हीओ-५२५२ च्या कागदपत्रासंदर्भात आरटीओ कार्यालयाकडे पत्र दिले. आरटीओ विभागाने सदरील ट्रकचा क्रमांक बनावट असल्याचे पत्रात नमुद करुन ओरिजनल क्र. (एमएच-१२ एन.एक्स. ९९८०) असल्याचे म्हंटले आहे. सदर ट्रक बनावट क्रमांक चालक गुरुप्रितसिंघ चिमा रा. नांदेड हा वापरत असल्याचे निष्पन्न झाले. पोलीस शिपाई गवेंद्र सिरमलवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन ट्रक चालक गुरुप्रितसिंग चिमाविरुध्द नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा अधिक तपास फौजदार ज्ञानेश्वर मटवाड करत आहेत.

दै. गोदातीर दि. ३१/०१/२५

# 'एमपीडीए' अंतर्गत सराईत गुन्हेगाराची हर्सुल कारागृहात एक वर्षासाठी रवानगी

**नांदेड (प्रतिनिधी)**- नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे आणि इतरत्र गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या एका सराईत गुन्हेगारास झोपडपट्टी दादा (एमपीडीए) कायद्यानुसार एक वर्षासाठी छत्रपती संभाजीनगर येथील हर्सुलच्या मध्यवर्ती कारागृहात २८ रोजी पाठविण्यात आले आहे.

सराईत गुन्हेगार अतिष गंगाधर शिंदे या गुन्हेगाराविरुद्ध, घातक हत्याराचा वापर करुन जिवे ठार मारण्याच्या प्रयत्नासहित जबरी चोरी, खूनाचा प्रयत्न, अश्लील शिवीगाळ करुन नुकसान करणे, दुखापत करणे, गृह आगळीक दुखापत करणे, अवैध शस्त्र बाळगणे व त्याचा वापर करणे अशा प्रकारचे गंभीर स्वरुपाचे दखलपात्र गुन्हे दाखल असल्याने नांदेड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्याकडून त्याच्याविरुध्द चझऊ अधिनियम प्रमाणे स्थानबध्द करण्या बाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्याकडे सादर करण्यात आला होता. पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांनी सदर आरोपीस एक वर्षाकरीता स्थानबध्द करण्याबाबतची शिफारस जिल्हादंडाधिकारी अभिजीत राऊत यांच्याकडे केली होती. त्यावरुन जिल्हाधिकारी राऊत यांनी आरोपी अतिष गंगाधर शिंदे (वय २९ वर्षे, रा. धनेगांव, ता.जि. नांदेड) यास छत्रपती संभाजीनगराती हर्सुल कारागृहात स्थानबध्द करण्याबाबतचे दि. २५ जानेवारी रोजी आदेश पारीत केले. त्यानंतर आरोपीला दि. २८ रोजी कारागृहामध्ये बंद करण्यात आले आहे.